आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक ०२ मार्च २०२५

ठळक बातम्या

1. राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरू होणार.

2. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते धापेवाडा येथील श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिरातील १६४ कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन.

3. नव्या तंत्रज्ञानाच्या अंगिकाराने प्रशासकीय कार्य अधिक लोकाभिमुख करण्याचे नागपूर मनपा आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांचे महानगरपालिकेच्या ७४वा वर्धापन दिनाप्रसंगी आवाहन.

4. रणजी कसोटी क्रिकेट स्पर्धेत केरळला हरवून तिसऱ्यांदा विदर्भ संघाने पटकावला रणजी करंडक.

अर्थसंकल्पीय अधिवेशन

राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरु होत आहे. राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या अभिभाषणानं अधिवेशनाला सुरुवात होईल. राज्याचा आगामी वर्षाचा अर्थसंकल्प १० मार्च रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात येईल. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आज सह्याद्री अतिथीगृह इथं चहापानाचा कार्यक्रम होणार आहे. तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांची संयुक्त वार्ताहर परिषद आज संध्याकाळी होणार आहे. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात संवाद असावा, मात्र फक्त चहापानाला जाऊन संवाद होत नसतो, असं सांगत विरोधकांनी चहापानावर बहिष्कार टाकला आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महाविकास आघाडीच्या वार्ताहर परिषदेत विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी ही भूमिका जाहीर केली. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना शिक्षा झाल्यामुळ त्यांनी पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी दानवे यांनी केली. पुण्यातल्या बलात्कार प्रकरणी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचं वक्तव्य असंवेदशील असून त्यांना मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार नाही, असंही दानवे म्हणाले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

नागपुरच्या धापेवाडा विकास आराखड्यांतर्गत १६४ पूर्णांक ६१ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. सार्वजनिक बांधकाम विभाग, मृद व जलसंधारण विभाग व नागपूर महानगर विकास प्राधिकरण यांच्या वतीने धापेवाडा येथे विविध विकासकामांचा भूमिपूजन सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशीष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार सावनेरचे आमदार आशीष देशमुख, उपस्थित होते. धापेवाडा येथे टेक्स्टाईल पार्क, मंदिराचा जिर्णोद्धार, जलशुद्धीकरण प्रकल्प, स्टेडियम या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे होणार आहेत. ही परिवर्तनाची सुरुवात लोकांच्या सहकार्यानेच होत आहे. विकास आराखडा मंजूर झाला. आता धापेवाड्याला आदर्श गाव करण्याची जबाबदारी गावाची आहे. महाराष्ट्रातील सुंदर-स्वच्छ गावाचा पुरस्कार आपल्या गावाला मिळाला पाहिजे यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावे, असे आवाहनही गडकरी यांनी केले.

*पुढल्या 15-20 दिवसामध्ये आपण सगळ्या फॉर्मॅलिटी पूर्ण करून त्याच भूमिपूजन करून भव्य बिल्डिंग बांधू आणि आज धापेवाडा, सावनेर, खापा या सगळ्या परिसरातल्या एकेकाळी हातमागवर जे काम करणाऱ्यांना उत्तम ट्रेनिंग देऊन वॅल्यू ॲडिशन करून धापेवाडा टेक्स्टाइलच्या साड्या या भारतात नाही, तर भारताच्या बाहेर देखील विकल्या जातील इतक्या उत्तम क्वालिटीच्या आहे. पण ऍग्रीकल्चर  बिझनेस स्कूल, फार्मर बिझनेस स्कूल हे आपण उघडलं पाहिजे आणि आपल्या शेतकऱ्याचे मुलं भारतात नाही तर जगाच्या कानाकोपऱ्यामध्ये जाऊन करोडो रुपयाचं पॅकेज मिळून त्याठिकाणी उत्तम उद्योगपती झाले पाहिजे. कृषीमालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे स्थापन केले पाहिजे.*

यावेळी कारंजा ते पांढुर्णा हा रस्ता मंजूर करण्याची घोषणाही त्यांनी केली.

वेव्ज समिट

वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल समिट- वेव्ज समिट २०२५ अंतर्गत सुरू होणाऱ्या एक्स आर क्रिएटर हॅकेथॉनच्या संवादात्मक कार्यक्रमाचं आयोजन शुक्रवारी इंदूर इथे करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात वेव्ज अंतर्गत येणाऱ्या विविध विषयांवरची चर्चासत्रं झाली, त्यात विविध तज्ञांनी सहभाग घेतला होता. माध्यमांमध्ये बदल घडवणाऱ्या अनेक घटकांविषयी त्यांनी मार्गदर्शन केलं. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आयोजित केलेल्या वेव्ज या कार्यक्रमाचा हा प्रमुख उपक्रम असून तो १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

केंद्रीय निवडणूक आयोग

निवडणूक आयोगातर्फे मतदारांना देण्यात येणारे एपिक नंबर एकाच वेळी दोन मतदारांना दिले गेले असल्यास त्यामुळे बनावट मतदार तयार होण्याचा प्रश्न उद्भवत नाही असं केंद्रीय निवडणूक आयोगान स्पष्ट केलं आहे. दोन वेगळया राज्यांमधल्या दोन मतदारांना एकच एपिक क्रमांक दिला गेल्याचं वृत्त काही माध्यमांमधून पसरलं असल्याच्या पार्श्वभूमीवर आयोगान हा खुलासा केला आहे. एकच एपिक क्रमांक असला तरी या मतदारांचं नाव वेगळया राज्यात, वेगळया विधानसभा मतदारसंघात, आणि वेगवेगळया मतदान केंद्रावर नोंदलेलं आहे. यापूर्वी मतदार नोंदणीची प्रक्रीया विकेंद्रीत असल्यान असे क्रमांक दिले गेले असावे. मात्र यापुढं सर्व पात्र मतदारांना एकमेव एपिक क्रमांक मिळावा यासाठी निवडणूक आयोग काम करत आहे, असं आयोगाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

नागपूर महानगरपालिका

दैदिप्यमान इतिहास लाभलेल्या नागपूर महानगरपालिकेचे प्रशासकीय कार्य नव्या तंत्रज्ञानाचा अंगिकार करुन अधिक सक्षमतेन लोकाभिमुख करा, अस आवाहन नागपूर महानगरपालिकेचे ५१वे आयुक्त आणि १४वे प्रशासक म्हणून कार्यभार सांभाळत असलेले डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले आहे.आज २ मार्च २०२५ रोजी नागपूर महानगरपालिकेचा ७४वा स्थापना दिवस सोहळा उत्साहात साजरा झाला. ७५ वर्षातील पदार्पण नागपूर महानगरपालिकेचा अमृत महोत्सव म्हणून साजरा केला जात आहे. मनपाच्या ७४ व्या वर्धापन दिन समारंभानिमित्त मनपा मुख्यालयातील हिरवळीवर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्ष स्थानी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी होते. २ मार्च १९५१ रोजी स्थापना झालेली नागपूर महानगरपालिका 'पौर जन हिताय' हे ब्रिद घेऊन ७४ वर्षांपासून अविरत जनसेवेचे कार्य करीत आहे. या महानगरपालिकेचे प्रथम महापौर बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांनी केंद्र शासनात महत्वाची भूमिका पार पाडली पुढे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी शहराच्या गौरवात भर पाडली. नागपूर शहराचे दोनदा महापौरपद भूषविणारे देवेंद्र फडणवीस महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आहेत. नागपूर महानगरपालिका अभिमान वाढविणारा दैदिप्यमान इतिहास आहे, असेही गौरवोद्गार आयुक्तांनी यावेळी काढले. प्रारंभी मनपा आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी आणि अन्य मान्यवरांनी नागपूर महानगरपालिकेचे प्रथम महापौर बॅरीस्टर शेषराव वानखेडे यांच्या पुतळयाला पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

बर्ड फ्ल्यू

वाशीम जिल्ह्यात बर्ड फ्ल्यूची लागण काही पक्षांना झाली असून त्या पार्श्वभूमीवर पशुधन विकास अधिकारी डॉ.रिचा चिकनकर यांनी पशु पालकांनी पशुधनाची घ्यावयाची काळजी याविषयी आकाशवाणीला माहिती दिली.........

*चिकन आणि अंडी तुम्ही निश्चितच खाऊ शकता, पण ते तुम्हाला 100 डिग्री सेल्सिअसच्यावर उकळून किंवा शिजवून खायचा आहे. त्यानंतर आपण जे जंगली पक्षी आहे त्यांचा संबंध आपल्या जे पक्षी आहे घरी बॅकयार्ड पोल्ट्री म्हणा किंवा तुमचं शेड आहे त्याच्याशी झाला नको पाहिजे आणि आमची हीच प्रयत्न आहे प्रशासनाच्या पशुसंवर्धन विभागाची तुम्ही घाबरून जाऊ नका. आता तुम्ही घाबरून अंडी चिकन खाण्या सोडू नका. बीकॉज या प्रोटीन सोर्स चांगला आहे आणि ते आपल्या बॉडीला डेफिशियन्सी नको व्हायला, त्यामुळे घाबरून खाण सोडू नका किंवा पक्ष्यांना मारून टाकू नका. जेव्हा प्रोटोकॉल येथील गाइडला येतील तेव्हा आम्ही तुमच्याशी कॉन्टॅक्ट करू कसं करायचं ते आम्ही तुम्हाला सांगू.*

संसर्गाचा फैलाव रोखण्यासाठी पोल्ट्री फार्मच्या परिसरात निर्जंतुकीकरण करण्यात येत असून प्रशासनाकडून सतत निरीक्षण ठेवले जात आहे. संशयास्पद पक्ष्यांचा मृत्यू आढळल्यास तातडीन जिल्हा पशुसंवर्धन विभागाला माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रणजी करंडक क्रिकेट

विदर्भ क्रिकेट संघानं आज देशांतर्गत क्रिकेट स्पर्धांमधल्या प्रतिष्ठित रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचं जेतेपद तिसऱ्यांदा आपल्या नावे केलं. या स्पर्धेच्या विजेतेपदासाठी नागपूरच्या जामठा येथील विदर्भ क्रिकेट असोसिएशन- व्हिसीए इथं विदर्भ आणि केरळ यांच्यात झालेला अंतिम सामना आज अनिर्णित राहिला. मात्र विदर्भानं पहिल्या डावात केरळवर मिळवलेल्या ३७ धावांच्या आघाडीच्या जोरावर जेतेपदाला गवसणी घातली. दरम्यान, मेहनत, जिद्द व चिकाटीच्या जोरावर केवळ सात वर्षात तिसऱ्यांदा बहुप्रतिष्ठित रणजी करंडकावर नाव कोरत इतिहास घडवणाऱ्या विदर्भ क्रिकेट संघाच आणि सर्व खेळाडूंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन करुन भविष्यात भारतीय क्रिकेट संघाला विदर्भ रणजी संघाच्या माध्यमातून उत्तमोत्तम खेळाडू लाभतील, अशी प्रतिक्रीया समाजमाध्यमावर दिली आहे.

हवामान

आज विदर्भात सर्वात जास्त तापमानाची नोंद ३८ पूर्णांक ५ अंश सेल्सिअस अकोल्यात झाली असून, नागपूरचं कमाल तापमान ३६ पूर्णांक २ अंश सेल्सिअस होते.